# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.कबचौउमवि/१६/पदवीप्रदान-बातमी/हस्तदेय/२०१९ दि. १९ जुलै,२०१९

जळगाव दि.१९ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या २८ व्या पदवीप्रदान समारंभात ज्या विद्यार्थ्यांना पदवी/पदवीका प्रमाणपत्र घ्यावयाचे आहेत त्यांनी दि. ३१ ऑगस्ट, २०१९ पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करावयाचे आहेत.

विद्यापीठा तर्फे घेण्यात आलेल्या परीक्षांमध्ये जे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत अशा सर्व विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्रासाठी ऑनलाईन अर्ज विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर Home Page वरील Student Corner Examination Convocation वर उपलब्ध आहेत. विनाविलंब शुल्कासह ऑनलाईन अर्ज भरण्याची मुदत दि. १५ जुलै ते ३१ ऑगस्ट् ,२०१९ पर्यंत असून दि.०१ सप्टेंबर ते दि.१५ सप्टेंबर,२०१९ या दरम्यान विलंब शुल्कासह ऑनलाईन अर्ज भरता येतील. नियमित पदवीप्रमाणपत्र शुल्क रूपये ३५०/- आहे. उत्तीर्ण वर्षापासून पाच वर्षा पेक्षा जास्त कालावधी झाले असल्यास रूपये १०००/- भरावे लागतील. विलंब शुल्क रूपये १००/- आहे. पदवीप्रमाणपत्राचे शुल्क क्रेडिट कार्ड/डेबीट कार्ड/ नेट बँकिग द्वारे ऑनलाईल भरावे असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन विभागाचे संचालक बी.पी.पाटील यांनी केले आहे.

---

जा.क्र.कबचौउमवि/१६/पदवीप्रदान-बातमी/हस्तदेय/२०१९ दि. १९ जुलै,२०१९

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या दैनिकात जळगाव, धुळे व नंदूरबार आवृत्तीत प्रसिद्ध करावी,ही विनंती.

आपला विश्वासू,

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी